**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या ८८ मतदारसंघात शांततेत मतदान सुरू

- राज्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघात ११ वाजेपर्यंत सुमारे १९ टक्के मतदान

- सर्व VVPAT मधल्या चिठ्ठ्यांची मोजणी करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली

**आणि**

- तिरंदाजी नेमबाजी आणि ॲथलेटिक्समध्ये भारतीय खेळांडूंची चमकदार कामगिरी

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी देशभरात शांततेत मतदान सुरू आहे. १२ राज्यं आणि जम्मू कश्मीरसह, एकूण ८८ मतदारसंघामधे या टप्प्यात आज मतदान होत आहे. केरळमधल्या २०, कर्नाटक-१४, राजस्थान-१३, उत्तरप्रदेश-८, मध्यप्रदेश-६, आसाम आणि बिहार प्रत्येकी ५, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगड प्रत्येकी ३, तर मणीपूर त्रिपूरा आणि जम्मू कश्मीरमधल्या प्रत्येकी एका जागेचा यात समावेश आहे. ११ वाजेपर्यंत त्रिपुरात सर्वाधिक ३६ टक्क्यांहून अधिक तर राज्यात सर्वात कमी सुमारे १९ टक्के मतदानाची नोंद झाली होती.

वायनाडमधून काँग्रेस नेते राहुल गांधी, तिरुअनंतपुरममधून केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर आणि काँग्रेस नेते शशी थरुर, दक्षिण बेंगळुरुमधून तेजस्वी सूर्या,

मथुरेत हेमामालिनी, मेरठमधून अरुण गोविल हे भाजपा नेते, मंड्या मतदारसंघातून कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एच डी कुमारस्वामी, इत्यादी महत्त्वाचे नेते या टप्प्यात निवडणूक लढवत आहे. एकूण १ हजार २०२ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघात सध्या शांततेत मतदान सुरू आहे. सकाळी ११ वाजेपर्यंत राज्यात १८ पूर्णांक ८३ शतांश टक्के मतदान झालं होतं. सर्वाधिक २१ पूर्णांक ७७ शतांश टक्के मतदानाची नोंद परभणीत झाली. सर्वात कमी १७ पूर्णांक ३७ शतांश टक्के मतदानाची नोंद अकोल्यात झाली. नांदेडमध्ये सुमारे २१ टक्के, वर्धा, हिंगोली आणि यवतमाळ-वाशिम आणि बुलडाण्यात सुमारे १८ टक्के आणि अमरावतीमध्ये पावणे १८ टक्के मतदानाची नोंद झाली होती.

**<><><><><>**

अकोला, हिंगोली, परभणी, नांदेड, यवतमाळ-वाशिम, अमरावती, वर्धा आणि बुलडाणा या मतदारसंघामधे मिळून २०४ उमेदवार या टप्प्यात नशीब आजमावत आहेत. यातले सर्वाधिक ३७ अमरावतीमध्ये असून सर्वात कमी १५ अकोल्यात आहेत. अमरावती, हिंगोली आणि परभणीत ३० पेक्षा अधिक उमेदवार रिंगणात आहेत, त्यामुळे याठिकाणी प्रत्येकी ३ बॅलेट युनिट, अकोल्यात १ आणि उर्वरित मतदारसंघात प्रत्येकी २ बॅलेट युनिट वापरात आहेत.

सर्व ८ मतदारसंघात एकूण १ कोटी ४९ लाख २५ हजार ९१२ मतदार आहेत. मतदार संख्येच्या दृष्टीकोनातून विचार करता सर्वाधिक २१ लाख २३ हजार ५६ मतदार परभणीत असून सर्वात कमी १६ लाख ८२ हजार ७७१ मतदार वर्धा लोकसभा मतदारसंघात आहेत.

या टप्प्यात एकूण १६ हजार ५८९ मतदान केंद्र उभारली असून सर्वाधिक २ हजार २९० परभणीत तर सर्वात कमी १ हजार ९६२ मतदान केंद्र बुलढाण्यात आहेत.

**<><><><><>**

परभणीत २० ठिकाणी मतदान यंत्रात बिघाड झाल्यानं ते बदलण्यात आले.

**हिंगोली** लोकसभा मतदार संघातील ताकळी तालुक्यातील मतदान केंद्रात मॉक पोल दरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रात तांत्रिक समस्या असल्याने, मतदान प्रक्रिया बाधित झाल्याचे वृत्त खाजगी वृत्तवाहिन्यांनी दिले होते. त्यावर जिल्हा निवडणूक प्रशासनाने तातडीनं कार्यवाही करत मतदान प्रक्रीया सुरळीत सुरू केली.

**वर्धा, अकोला** मतदार संघात मतदानयंत्रात बिघाड झाल्यानं मतदान प्रक्रिया थांबल्याचं वृत्त होतं. त्यावर जिल्हा प्रशासनानं तातडीनं कारवाई करत मतदान सुरळीत सुरू केलं.

**<><><><><>**

निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात उमेदवारी अर्जांची छाननी सुरू आहे. यामध्ये राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीडसह अकरा मतदारसंघाचा समावेश आहे. या मतदारसंघात एकूण ४४७ उमेदवारांचे ६१८ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली. औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात ५१ उमेदवारांचे ७८ अर्ज दाखल झाले. जालना - ४७ उमेदवारांचे ६८ अर्ज, बीड लोकसभा मतदारसंघात ७६ उमेदवारांचे ९९ अर्ज, नंदुरबार - १८ उमेदवारांचे ३१ अर्ज, जळगाव- २४ उमेदवारांचे ३६ अर्ज, रावेर - ३१ उमेदवारांचे ४५ अर्ज, मावळ - ३८ उमेदवारांचे ५० अर्ज, पुणे- ४२ उमेदवारांचे ५८ अर्ज, शिरूर- ४६ उमेदवारांचे ५८ अर्ज, अहमदनगर- ४३

उमेदवारांचे ५५ अर्ज, तर शिर्डी लोकसभा मतदारसंघात ३१ उमेदवारांचे ४० अर्ज दाखल झाले आहेत.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी अर्ज भरायला आजपासून सुरुवात झाली. या मतदारसंघात इच्छुकांना ३ मे पर्यंत अर्ज भरता येतील. यात राज्यातल्या १३ मतदारसंघांसह देशातल्या एकूण ४९ मतदारसंघांचा समावेश आहे. त्यात मुंबईतले सर्व ६ मतदारसंघ, ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

**<><><><><>**

सर्व 'VVPAT', म्हणजेच वोटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेलमधल्या सर्व चिठ्ठ्यांची मोजणी करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळली. नायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या पिठानं हा निर्णय दिला. निवडणूक आयोगानं दिलेल्या स्पष्टीकरणाच्या आधारावर न्यायालयानं आज हा निर्णय दिला.

मतपत्रिकेद्वारे मतदान करणं, EVM-VVPAT ची संपूर्ण तपासणी करणं आणि मतदारांना VVPAT स्लिप देण्याबाबतच्या याचिका फेटाळण्यात आल्याचं न्यायमूर्ती खन्ना यांनी हा निकाल देताना सांगितलं. मात्र, सर्वोच्च न्यायालयानं निवडणूक आयोगाला दोन निर्देश दिले. त्यानंतर EVM मध्ये चिन्ह लोड केल्यानंतर, चिन्ह लोडिंग करणारं युनिट सीलबंद करावं आणि कंटेनरमध्ये सुरक्षित करावं. उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींनी या सील वर स्वाक्षरी करावी. तसंच निकाल जाहीर झाल्यानंतर किमान ४५ दिवस ईव्हीएमसह सीलबंद कंटेनर स्टोअर रूममध्ये ठेवावेत. ईव्हीएम प्रमाणेच ते उघडावेत आणि सीलबंद करावेत. दुसऱ्या

निर्देशानुसार ५ टक्के ईव्हीएममधले burnt memory semicontroller उमेदवारांच्या मागणीनुसार उत्पादकांच्या अभियंत्यांची तपासावे. अशा प्रकारची विनंती निकाल जाहीर झाल्यावर सात दिवसांच्या आत करणं आवश्यक आहे. अशा विनंतीवर झालेला खर्च उमेदवार उचलेल. ईव्हीएममध्ये छेडछाड झाली असेल, तर तो खर्च उमेदवाराला परत केला जाईल.

**<><><><><>**

भारतीय क्रीडापटूंनी दुबईत सुरु असलेल्या एकविसाव्या 20 वर्षाखालील आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये पुरुष आणि महिला गटातल्या तीन हजार मीटर स्टेपलचेस स्पर्धेत वर्चस्व गाजवलं.  महिला गटात एकता डै तर पुरुष गटान रणवीर सिंग याने सुवर्णपदक पटकावलं. त्याआधी  अनुराग सिंग कालेर ने शॉटपुट मध्ये पुरुष गटात सुवर्णपदक जिंकलं.  भारतीय क्रीडापटूंनी या स्पर्धेत आज सात पदकं पटकावली.

**<><><><><>**

कोरियात काल झालेल्या पॅरा नेमबाजीत महिलांच्या 10 मी. एअर रायफल प्रकारात भारताची पॅराशूटर मोना अगरवालने सुवर्ण पदक मिळवलं.  भारतीय लष्करातल्या अमीर अहमद भट्ट ने 25 मीटर  पिस्तोल प्रकारात रजत पदक मिळवलं.

**<><><><><>**

चीनमध्ये शांघाय इथं सुरु असलेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत ज्योती सुरेखा वेन्नम आणि अभिषेक वर्मा यांच्या संयुक्त मिश्र संघानं आज अंतिम फेरीत प्रवेश केला, आणि भारताचं चौथं पदक निश्चित केलं. उद्या सुवर्णपदकाच्या लढतीत त्यांचा सामना एस्टोनियाच्या संघाबरोबर होणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघात सध्या शांततेत मतदान सुरू आहे. दुपारी १ वाजेपर्यंत राज्यात ३१ पूर्णांक ७७ शतांश टक्के मतदान झालं होतं. सर्वाधिक सुमारे ३४ टक्के मतदानाची नोंद परभणीत झाली. सर्वात कमी सुमारे २९ टक्के मतदानाची नोंद बुलडाण्यात झाली. नांदेडमध्ये ३३ टक्के, वर्धा, अकोल्यामध्ये सुमारे ३२ टक्के, यवतमाळ-वाशिमध्ये साडे ३१ टक्के, हिंगोलीत साडे ३० टक्के मतदान झालं.

**<><><><><>**

देशाच्या पूर्व आणि दक्षिण द्वीपकल्प प्रदेशात पुढले ४ दिवस तीव्र-ते अती-तीव्र स्वरूपाची उष्णतेचे लाट राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. बिहार, झारखंड, आंध्रप्रदेशच्या पूर्व भागात येत्या ३० एप्रिल पर्यंत, तर पश्चिम उत्तर प्रदेश आणि कोकणात येत्या २९ एप्रिल पर्यंत उष्णतेची लाट राहील असा अंदाज आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण कोल्हापूर आणि हातकंणगले लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**//<><><><><>//**